१. आपली रचना, काये व कर्तव्ये यांचा तपशील :

हे कार्यालय मुंबई उच्च न्यायालयाच्या अधिपत्याखाली येते. या जिल्हयामध्ये एकूण ११ तालुके असून प्रत्येक तालुक्यासाठी कनिष्ठ स्तर दिवाणी व फौजदारी न्यायालये कार्यरत आहेत. माण तालुक्यामधे दहीवडी व म्हसवड अशा दोन ठिकाणी अशी न्यायालये स्थापित आहेत. कराड व पाटण या दोन तालुक्यासाठी कराड येथे वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायालय तसेच अप्पर जिल्हा न्यायालये अशी दोन न्यायालये स्थापित आहेत. या सर्व न्यायालयामधून दिवाणी व फौजदारी स्वरुपांच्या खटल्यांचा न्यायनिवाडा केला जातो जिल्हयासाठी एक प्रमुख जिल्हा न्यायाधीश कार्यात आहेत.न्यायदानाव्यतिरिक्त संपूर्ण जिल्हयाची विभाग प्रमुख म्हणून प्रशासनाचे ते कार्य करित असतात. बाकी न्यायालयासाठी जिल्हा न्यायाधीश, मुख्य न्यायदंडाधिकारी, दिवाणी न्यायाधीश व. स्तर, दिवाणी न्यायाधीश क. स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग दर्जाचे न्यायाधीश कार्यात आहेत. या कार्यालयाकडे मुख्यत: न्यायदान करणे हे कार्य आहे.

२.आपले अधिकारी व कर्मचारी यांचे अधिकार व कर्तव्ये :

या विभागात कार्यरत असणा—या न्यायाधीश न्यायिक अधिकारी यांचे अधिकार व कर्तव्ये

अ. प्रमुख जिल्हा न्यायाधीश – दिवाणी फौजदारी अपीलातील तंटयाचे न्यायदान व सुपूर्ण जिल्हयाचे विभाग प्रमुख या नात्याने प्रशासन अपिलीय अधिकार.

ब. जिल्हा न्यायाधीश – दिवाणी व फौजदारी अपीले सेशन्स खटल्यांचे न्यायदान अपिलीय अधिकारी

क. दिवाणी न्यायाधीश व. स्तर – रुपये एक लाखावरिल आर्थिक मर्यादेच्या दाव्यांचे तसेच सरकारविरुध्द किंवा सरकारने केलेल्या दिवाणी दाव्यांचे न्यायदान करणे.

ड. दिवाणी न्यायाधीश क. स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग – रुपये एक लाख आर्थिक मर्यादेपर्यंतच्या दिवाणी प्रकरणातील न्यायदान तसेच फौजदारीकडील प्रकरणांचे न्यायदान करणे न्यायदान प्रक्रीयेतील मूळ न्यायालय.

इ. कर्मचा—यांसाठी मन्युअल्समधे नमुद केलेप्रमाणे कर्तव्ये दिलेली असतात व त्याप्रमाणेच ते पार पाडतात

३. निर्णय घेण्याच्या प्रक्रीयेत अनुसरण्यात येणारी कार्यपध्दती, तसेच पर्यवेक्षण व उत्तरदायित्व :

हा न्यायिक विभाग असल्याने कायदा व नियम यांनी अनुबंधित केलेल्या तरतूदीनुसारच निर्णय घेतले जातात.

४. स्वत:ची कार्ये पार पाडण्यासाठी त्याच्याकडून ठरविण्यात आलेली मानके :
या विभागासाठी दिवाणी व फौजदारी व्यवहार प्रक्रीया मॅन्युअल्सद्वारे कार्यपध्दती ठरवून दिलेली आहे व त्यानुसारच कार्ये पार पाडली जातात.

५. त्याच्याकडे असलेले किंवा त्याच्या नियंत्रणात असलेले किंवा त्याची कार्ये पार पाडण्यासाठी त्याच्या कर्मचारी वर्गाकडून वापरण्यात येणारे नियम, विनियम, सूचना नियमपुस्तिका आणि अभिलेख

दिवाणी व फौजदारी मॅन्युअल्सद्वारे कर्मचा—यांची कर्तव्ये ठरविण्यात आलेली आहेत व त्याला अनुसरुनच ते ती कर्तव्ये पार पाडत असतात.

६ त्याच्याकडे असलेल्या किंवा त्याच्या नियंत्रणाखाली असलेल्या दस्तऐवजांच्या प्रवर्गाचे विवरण :
दिवाणी व फौजदारी खटल्यांची प्रकरणे, अभिलेख निकाली खटल्यातील प्रकरणे अशा मजकुरांची दस्तऐवज असतात.

७. आपले धोरण तयार करण्याच्या किंवा त्याची अंमलबजावणी करण्याच्या संबंधात लोकांशी विचारविनिमय करण्यासाठी किंवा लोकांकडून निवेदने केली जाण्यासाठी अस्तित्वात असलेल्या कोणत्याही व्यवस्थेचा तपशील :

सदरचा न्यायिक विभाग असलेने न्यायदानामध्ये लोकांकडून निवेदने वगैरे घेण्याचा प्रश्न अस्तित्वात येत नाही. न्यायाधीशांनी निस्पृहतेने न्यायादान करणे आवश्यक असते.तथापि आता लोकन्यायालयाची संकल्पना अस्तित्वात आलेली आहे व कार्यरतही झालेली आहे त्यानुसार लोकांचा सहभाग घेउन प्रकरणे जास्तीत जास्त प्रमाणात समेट घडवून मिटविण्यासाठी प्रयत्न केले जातात.

८. आपला एक भाग म्हणून किंवा सल्ला देण्याच्या प्रयोजनासाठी म्हणून घटीत केलेल्या दोन किंवा अधिक व्यक्तींच्या मिळून बनलेल्या मंडळाचे, परिषदांचे समित्यांचे आणि अन्य निकायांचे विवरण आणि त्या मंडळांच्या परिषदांच्या समित्यांच्या आणि अन्य बैठकी लोकांसाठी खुल्या आहेत किंवा कसे किंवा अशा बैठकीची कार्यवृत्ते जनतेला पहावयास मिळण्याजोगी आहेत किंवा कसे याबाबतचे विवरण :

या विभगाअंतर्गत विधी सेवा प्राधिकरण वैकल्पिक वाद निवारण कक्ष कन्सिलेशन कोर्ट अशा स्वरुपांच्या समित्यांची सीापना करण्यात आलेल्या आहेत. या समित्यांवर बनलेल्या मंडळामार्फत मोफत कायदाविषयी लोकजागृती वगैरे स्वरुपाची कामे सदर समितीमार्फत केली जातात. सदरकामी लोकांचासुध्दा सहभाग घेतला जातो व अशा बैठकांची कार्यवृत्ते लोकासाठी खुल्या असतात व कार्यवृत्ते जनतेला पहावयास मिळू शकतात.

९. आपल्या अधिका—यांची आणि कर्मचा—यांची निर्देशिका :

या विभागात कार्यरत असणा—या न्यायिक अधिकारी व कर्मचाारी यांनी सचोटीने व कर्तव्य परायणतेने कर्तव्य करावे अशा स्वरुपांची बंधने सर्वांवर लागू असतात. उच्च न्यायालयाचे मार्गदर्शनानुसार तसेच हायकोर्ट दिवाणी / फौजदारी मॅन्युअल्समधील तरतुदीनुसार न्यायिक अधिकारी व कर्मचारी यांची निर्देशिका ठरवून दिलेली आहे.

१०.  आपल्या प्रत्येक अधिका—याला व कर्मचा—याला मिळणारे मासिक वेतन , तसेच प्राधिकरणाच्या विनियमांमध्ये तरतूद केल्याप्रमाणे नुकसान भरपाई देण्याची पध्दत :

न्यायविभागात कार्यरत असणा—या न्यायिक अधिकारी व कर्मचारी यांना महाराष्ट्र शासनाने निश्चित केलेल्या वेतनदरानुसार मासिक वेतन मिळते व दरमहाचे वेतन शासनाने निदेश केलेप्रमाणे बॅंकेमार्फत दिले जाते.  तसेच नुकसान भरपाई देण्याची पध्दत प्रचलित नाही.

११. सर्व योजनांचा तपशील, प्रस्तावित खर्च दर्शविणारा, आपल्या अभिकरणाला नेमून दिलेला अर्थसंकल्प आणि संवितरित केलेल्या रकमांचा अहवाल :

न्यायालयांकडे न्यायदानाव्यतिरिक्त कोणत्याही प्रकारच्या योजना राबविल्या जात नसेलेने त्यासाठी प्रस्तावित खर्च दर्शविण्याचा प्रश्न उदभवत नाही.

१२. अर्थसहाय कार्यक्रमाच्या अंमलबजावणीची रीत तसेच वाटप केलेल्या रकमा आणि अशा कर्मचा—यांच्या लाभाधिका—यांचा तपशील :

न्यायविभागात काम करणा—या कोणत्याही अधिकारी अथवा कर्मचा—यास वेतनाव्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचे अर्थसहाय दिले जात नाही.

१३. ज्या व्यक्तींना सवलती, परवाने किंवा प्राधिकारपत्रे दिलेली आहेत अशा व्यक्तींचा तपशील:

जिल्हा न्यायालयाकडून कोणत्याही व्यक्तीला सवलती, परवाने किंवा प्राधिकरणपत्रे दिली जात  नाहीत.

१४. इलेक्ट्रॉनिक स्वरुपात त्यास उपलब्ध असलेल्या किंवा त्याच्याकडे असलेल्या माहितीच्या संबंधातील तपशील :
न्यायविभागाची तसेच जिल्हा न्यायालय, साताराची वेबसाईट उपलब्ध आहे.
http://court.mah.nic.in

१५. माहिती मिळविण्यासाठी नागरिकांना उपलब्ध उसणाऱ्या सुविधांचा तपशील, तसेच सार्वजनिक वापरासाठी चालविण्यात येत असलेल्या ग्रंथालयाच्या किंवा वाचनालयाच्या कामकाजाच्या वेळांचा तपशील :

या विभागात अभिलेख कक्ष वेगळा आहे. माहिती मिळविण्यासाठी संबंधित कागदपत्राांच्या प्रमाणित नकला मागणीसाठी वेगळी स्वतंत्र व्यवस्था आहे. न्यायालयाचे ग्रंथालय आहे व ते दररोज सुट्टीचा दिवस सोडून सकाळी १०.३० ते ६.०० पर्यंत खुले असते.

१६. जन माहिती अधिकाऱ्यांची नावे, पदनामे आणि इतर तपशील :

जनमाहिती अधिकारी : श्री. बी. के. पानस्कर, प्रबंधक, जिल्हा न्यायालय,सातारा

१७. विहित करण्यात येईल अशी इतर माहिती :

सदरचे कार्यालयामध्ये न्यायदानाचे काम चालते. हे काम खुल्या न्यायालयात चालविले जाते य ामध्ये कोणतीही गोपनीयता नसते. न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात दिला जातो. जनतेसाठी तो खुला असतो. निकालपत्राच्या तसेच इतर कागदपत्रांच्या प्रमाणित नकला मागितल्यास त्या योग्य ते चार्जेस भरुन मिळू शकतात.

सही/—
पं. बा. जाधव.

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, सातारा.